


दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २३३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.०४ एप्रिल २०२५




## वक्फच्या जमिनींवर डोळा ठेवूनच विधेयक आणलं : उद्धव ठाकरे

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, मुंबई :** आज ३ एप्रिल आहे आणि काल २ एप्रिल होती. अशी सुरुवात अशासाठी केली की आठवण होऊ नये म्हणून काल वक्फची चर्चा घडवली. अमेरिकेने भारताला सांगितलं होतं की कर कमी करावे नाहीतर आम्हीही कर लादू. याची सुरुवात झाली आहे याकडे दुर्लक्ष व्हावं म्हणून वक्फ विधेयक मांडलं गेलं असा आरोप उद्धव ठाकरेंनी केला आहे.

**आर्थिक संकटाबाबत देशाला विश्वासात घ्यायला हवं होतं**

देशाला विश्वासात घेणं आवश्यक होती. आपल्याला काय पावलं उचलावी लागतील? परिणाम काय होतील याची चर्चा सरकारने करायला हवी होती. करोना काळात मी मुख्यमंत्री होतो. मोदीही तेव्हा घरी बसूनच काम करत होते. आमच्याशी त्यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग केली होती. तसं काहीतरी करुन मोदींनी अमेरिकेच्या करांबाबत सांगितलं असतं तर आम्ही पाठिंबा दिला असता. अमेरिकेने आयात शुल्क लावलं हे कळू द्यायचं नाही म्हणून वक्फचा विषय आणला गेला.




**ईदच्या पार्ट्या झोडून विधेयक आणलं गेलं-उद्धव ठाकरे**

आजही अधिवेशन आहे. सगळे विषय बाजूला ठेवून देशाला त्यांनी शासकीय भाषेत आर्थिक संकटाबाबत अवगत केलं पाहिजे. नुकतीच ईद साजरी झाली. सगळ्या लोकांनी ईदच्या मेजवान्या झोडल्या आणि वक्फचं बिल मांडलं. किरण रिजेजू यांनी वक्फचं बिल मांडलं. किरण रिजेजू यांनी गोमांस खाण्याचं समर्थन केलं होतं. त्यांनीच हे बिल मांडलं हा एक योगायोग किंवा विलक्षण योगायोग होता.

**भाजपाचं काय चाललंय कळतच नाही-उद्धव ठाकरे**

भाजपाचं काय चाललंय कळत नाही. कधी सांगतात औरंगजेबाची कबर खोदा, यांचे लोक कुदळ, फावडी घेऊन जातात मग वरुन आदेश येतो की थांबा खोदू नका. मग परत माती टाकतात. मशिदीत घुसून मारणार सांगतात, मारायला गेलं की सांगायचं थांबा, सौगात ए मोदी घेऊन जा. लोकांना एकमेकांमध्ये लढवायचं आणि त्यावर आपल्या राजकारणाच्या पोळ्या भाजायच्या हे चाललं आहे. आत्तापर्यंतचा अनुभव असा आहे की भाजपाचे दाखवायचे दात आणि खायचे दात वेगळे आहेत. ३७० कलम काढलं गेलं तेव्हा आम्ही पाठिंबा दिला. हजारो कश्मिरी पंडीत निर्वासित झाले होते. त्यावेळी हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरेंनी त्यांना आसरा दिला. ३७० कलम काढून इतकी वर्षे झाली आहेत. काश्मिरी पंडितांना किती जमिनी परत मिळाल्या? हे आधी भाजपाच्या लोकांनी, गृहमंत्र्यांनी सांगावं. पाकव्याप्त काश्मीरबाबत काही भूमि का घेतलेली नाही. चीनच्या अतिक्रमणबाबत कुणीही काही बोलत नाही.

भाजपाचा वक्फच्या जमिनींवर डोळा आहे-उद्धव ठाकरे

वक्फच्या जमिनी ताब्यात घेणार हे दिसतंय म्हणजेच यांचा जमिनींवर डोळा आहे. मोहम्मद अली जिना यांनाही लाजवेल अशी मुस्लिमांची बाजू अमित शाह यांच्यापासून सगळ्यांनी काल केली. देशाच्या इतिहासात मुस्लिम समाजाचा कळवळा आणणारी भाषणं सगळ्यांनी केली. हे बिल मुस्लिमांच्या बाजूने आहे की विरोधात आहे? जर बाजूने असेल तर मग तुम्ही हिंदुत्व सोडलं का? तुम्ही आम्हाला बाळासाहेबांचे विचार शिकवू नका. १९९५ मध्ये सत्ता आली होती तेव्हा इस्तेमासाठी दिली होती, आज बरोबर तिच जागा तुम्ही बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या घशात घातली गेली आहे असाही आरोप उद्धव ठाकरेंनी केला. तसंच हे तुमचं हिंदुत्व आहे का? असाही प्रश्न उद्धव ठाकरेंनी विचारला.

## आ.अभिजीत पाटील यांचे अधिवेशनातील प्रश्नावर उपमुख्यमंत्री अजित पवारांचा ठोस निर्णय

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०३, पंढरपूर :** साखर उद्योगातील ट्रॅक्टर मालकांची फसवणूक करणाऱ्या ऊस तोडणी टोळी मुकादमांविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने ठोस पावले उचलली आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत या संदर्भात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

मुंबईत पार पडलेल्या या बैठकीस सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार अभिजीत पाटील, गृह, नियोजन, वित्त, सामाजिक न्याय, कामगार विभागांचे प्रधान सचिव, साखर आयुक्त, साखर संघाचे अध्यक्ष आणि इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

सदर बैठकीतील पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आले यामध्ये १) कठोर कायद्याची निर्मितीः टोळी मुकादमांच्या फसवणुकीला आळा घालण्यासाठी नवीन कायदा तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अनेक वेळा फसवणुकीचे गुन्हे दाखल होऊनही आरोपी सुटतात आणि पुन्हा फसवणूक करतात. या पार्श्वभूमीवर, नवीन कायद्याद्वारे कठोर कारवाई केली जाईल.

२) फसवणूक करणाऱ्या मुकादमांची यादी जाहीर करणेः फसवणूक करणाऱ्या टोळी मुकादमांची यादी जाहीर करून इतरांना सावध करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ३) वाहन मालकांचे संरक्षणः टोळी मुकादमांच्या बोगस करारांमुळे वाहन मालकांचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी कायदेशीर संरक्षण देण्याच्या उपाययोजना केल्या जातील. ४) समितीची स्थापनाः साखर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीत कामगार, सामाजिक न्याय, गृह विभाग, गोपीनाथ मुंडे कामगार मंडळाचे



वरिष्ठ अधिकारी, ट्रॅक्टर मालक, आमदार, साखर कारखान्यांचे चेअरमन यांचा समावेश आहे.

ही समिती एक महिन्याच्या आत अंतिम निर्णय घेईल. ५) ऊसतोड कामगारांची नोंदणीः गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार मंडळाच्या माध्यमातून कामगारांची नोंदणी एक महिन्याच्या कालावधीत करण्यात येईल, ज्यामुळे कामगारांना ओळखपत्रे देण्यात येतील.६) फसवणूक करणाऱ्या मुकादमांविरोधात गुन्हे दाखल करणेः ऊस वाहतूक मालकांची फसवणूक करणाऱ्या ऊसतोड मुकादमांविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करून कारवाई करण्याचे परिपत्रक काढण्यात येईल. या ठोस पावलांमुळे ट्रॅक्टर मालकांना न्याय मिळेल आणि साखर उद्योग अधिक पारदर्शक होईल. टोळी मुकादमांच्या फसवणुकीला आळा घालण्यासाठी हा कायदा महत्त्वाचा ठरेल.

## लोणारमध्ये नकली नोटांचे रॅकेट!

**दि.०३, बुलडाणा :** पोलिसच काय कोणताही केंद्रीय, राज्य सरकारी कर्मचारी देखील जागृत असला अथवा दक्ष असला तरी त्याचा किती चांगला परिणाम दिसू शकतो, याचे एक उदाहरण आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन स्थळ असलेल्या लोणार नगरीत दिसून आले. एका बँकेच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांनी दक्षता बाळगल्याने नकली नोटाचे एक मोठे रॅकेट (टोळी) पोलिसांच्या हाती लागले आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता दहशतवाद विरोधी पथकाने देखील लोणार मध्ये दाखल होत आरोपीची चौकशी केली आहे. यामुळे या मागे काही देश विघातक संघटना तर नाही ना अशी शंका निर्माण झाली आहे.

खाऱ्या पाण्याचे जगातील तिसऱ्या क्रमांकाचे सरोवर ही लोणार नगरीची ओळख आहे. यामुळे सरोवर नगरी लोणार पर्यायाने बुलढाणा जिल्ह्याचे नाव जगभरात गेले आहे. दरवर्षी लोणारमध्ये विदेशातील अनेक शास्त्रज्ञ, संशोधक येतात. या




लोणारमध्ये नकली नोटांचे मोठे रॅकेट समोर आले आहे. लोणार पोलिसांनी आतापर्यंत ५ आरोपींना अटक केली आहे. यातील एक आरोपी उच्च शिक्षित देखील आहे. आरोपी लोणार आणि लोणार तालुक्यातील सुलतानपूर येथील राहणारे आहे. यात आणखी आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. या आरोपीचे मोठ्या संघटनेशी संबंध असण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. त्यामुळे या संवेदनशील प्रकरणाचे एकूणच गांभीर्य लक्षात घेता लोणार पोलिसांनी या प्रकरणात कमालीची गोपनीयता बाळगली आहे. लोणार पोलीस यावर तपशीलवार बोलण्यास इच्छुक नाहीत मात्र संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याने या कारवाईबाबत माहिती दिली. आज अखेर पाच आरोपीना क्रमा क्रमाने ताब्यात घेण्यात आल्याचे त्यांनी बोलतांना सांगितले. काल बुधवारी, २ एप्रिल रोजी दहशतवाद विरोधी पथक (एटीएस) लोणार मध्ये दाखल झाले होते. त्यांनी देखील आरोपींची कसून चौकशी केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या आरोपींचे हैदराबादसह शेजारी राष्ट्राशी संबंध आहेत का ? किंवा कुठल्या देश विघातक कृत्यांमध्ये हे आरोपी सहभागी आहेत का? या दृष्टीने दहशतवाद विरोधी पथकाने आरोपींची चौकशी केली आहे. मात्र या चौकशीतून काय समोर आले हे अद्याप कळू शकले नाही.

**असे उघड झाले रॅकेट !**

विश्वसनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार मागील आठवड्यात एक माणूस भारतीय स्टेट बँकेत पैसे भरण्यासाठी आला होता. मात्र तो भरत असलेल्या नोटा नकली असल्याचे आढळून आले होते. त्यानंतर दक्ष बँक कर्मचारी, अधिकारी यांनी याबद्दलची माहिती पोलीस प्रशासनाला दिली होती. यानंतर एक एक करत आतापर्यंत पोलिसांनी पाच आरोपींना अटक केली आहे. विशेष म्हणजे यातील एक आरोपी हा उच्च शिक्षित आहे . आरोपी लोणार आणि सुलतानपूर येथील असल्याचे सूत्रांनी सांगितले, मात्र आरोपी बद्दल कमालीची गोपनीयता पाळण्यात येत आहे, कारण यात आणखी मोठे मासे गळाला लागतात का ? या दृष्टीने पोलिसांचे प्रयत्न सुरू आहेत. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने या प्रकरणाचा दुजोरा दिलेला असला तरी तपासाच्या कारणास्तव अधिक बोलण्यास नकार दिला.काल या प्रकरणात दहशतवाद विरोधी पथकाने देखील आरोपींची चौकशी केली. नकली नोटांच्या माध्यमातून आरोपींचा देश विघातक कृत्यांमध्ये सहभाग आहे का? नकली नोटा कुठून आल्या याबद्दल दहशतवाद विरोधी पथकाने चौकशी केल्याचे समजते.

## थोडक्यात

### हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविण्यासाठी ३० जून पर्यंत मुदतवाढ

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०३, ठाणे :** परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी महाराष्ट्र राज्यातील दि.०१ एप्रिल २०१९ पूर्वीच्या नोंदणीकृत मोटार वाहनांवर हाय सिक्यूरिटी नंबरप्लेट (एच एसआरपी) बसविणे बंधनकारक करणेबाबत सूचित केले आहे. त्याकरिता परिवहन विभागाने उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण कार्यालयासाठी मे. रियल मेझॉन इंडिया लिमिटेड एजन्सीची नियुक्ती केली असून क्ष्ठझ बुकिंग पोर्टल लिंक/ युआरएल https://hsrpmhzone2.in आहे. या लिंकवर वाहनांसंबधित आवश्यक सर्व माहिती अचूक भरावी जेणेकरुन कोणतीही तांत्रिक अडचण येणार नाही, मोटार वाहनांवर हाय सिक्यूरिटी नंबरप्लेट साठी लागणारे शुल्क आणि लागणारा वेळ/दिवस निर्धारित केले आहेत.

**शुल्क पुढीलप्रमाणे:-**

दुचाकी आणि ट्रॅक्टर रू.४५०/-, थ्री व्हीलर रू ५००/-, लाईट मोटर वेहिकल, पॅसेंजर कार्स, मिडीयम कमर्शियल व्हेईकल, हेवी कमर्शियल व्हेईकल आणि ट्रेलर कॉम्बिनेशन रु.७४५/-.

यापूर्वी परिवहन विभागाच्या सूचनेनुसार हाय सिक्यूरिटी नंबरप्लेट दि.३१ मार्च २०२५ पर्यंत बसविण्याचे निर्देश देण्यात आले होते. आजपर्यंत जुन्या वाहनांना हाय सिक्यूरिटी नंबरप्लेट बसविण्याचे काम फारच कमी झाले असल्याने जुन्या वाहनांना हाय सिक्यूरिटी नंबरप्लेट बसविण्यासाठी दि.३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे, असे कल्याण उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांनी कळविले आहे.

### आयुक्त डॉ.इंदुराणी जाखड यांची कार्यकाल संपण्याआधीच बदली



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, कल्याण :** कल्याण डोंबिवली पालिकेच्या आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांची पालघर जिल्हाधिकारी म्हणून शासनाने मंगळवारी बदली केली. डॉ. इंदुराणी जाखड या कल्याण-डोंबिवली महापालिकेला आयएएस दर्जाच्या पहिल्या महिला आयुक्त होत्या. दीड वर्षाच्या कालावधीत डॉ. जाखड यांनी प्रशासकीय कामात शिस्त आणण्यात, पालिकेतील कर्मचाऱ्यांचे पदोन्नत्ती, अनुकंपा, वारसा हक्क भरतीचे प्रश्न मार्गी लावण्यात महत्वाची भूमिका बजावली.

प्रशासकीय कामातील कर्तव्यात कसूरपणा करणाऱ्या कर्मचारी, अधिकाऱ्यांना त्यांनी वेळीच खडेबोल सुनावले. थेट निलंबनाची कारवाई केली. सतरा महिन्याच्या कालावधीत आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी प्रशासनावर चांगली पकड बसवली होती. नागरिकांचे प्रश्न सोडविण्यावर त्यांचा भर होता. पालिकेचा चालू वर्षीचा अर्थसंकल्प मांडताना पालिकेची तिजोरी पाहून त्यांनी फार मोठ्या विकास प्रकल्पांच्या घोषणा केल्या नव्हत्या. महापालिकेचे उत्पन्न वाढावे यासाठी त्यांचा प्राधान्यक्रम राहीला होता. राजकीय रेट्यामुळे त्यांच्या काळात अनेक महत्वाचे प्रकल्प कल्याण, डोंबिवली शहरात सुरू करण्यात आले. मात्र यातील बहुसंख्य प्रकल्पांना म्हणावा तसा वेग मिळालेला नाही.

कल्याण-डोंबिवली महापालिका आयुक्त म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर डॉ. इंदुराणी जाखड यांनी आक्रमकपणे प्रशासकीय कामकाज सुरू केले होते. त्यांच्या कार्यकाळात काही रखडलेले प्रकल्प मार्गी लागतील अशी अपेक्षा व्यक्त होत होती. बेसुमार बेकायदा बांधकामांमुळे कल्याण, डोंबिवली शहरांना उकीरडा होऊ लागला आहे. डॉ. जाखड यांच्या कार्यकाळात मोठया प्रमाणावर बेकायदा बांधकामाविरोधात कारवाई करण्यात आली. असे असले तरी अशा बांधकामांना पुर्णपणे आळा घालणे त्यांनाही जमले नाही. महापालिकेचे उत्पन्न वाढायला हवे यासाठी त्यांनी मालमत्ता कर वसुलीसाठी विशेष मोहीम राबवली होती.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे खासदार पुत्र डॉ. श्रीकांत शिंदे यांची कल्याण डोंबिवली महापालिकेतील कामकाजावर पुर्ण पकड आहे. शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्री पद असताना जाखड यांची या महापालिकेत आयुक्तपदी नियुक्ती झाली. प्रशासकीय सेवेची शिस्तप्रिय कार्यपध्दतीची चुणूक त्यांनी आपल्या कामकाजातून दाखविण्यास सुरूवात केली होती. महापालिकेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांमधील राजकारण याविषयी त्या सतर्क होत्या. कल्याण-डोंबिवली शहरासाठी प्रथमच एक भारतीय प्रशासकीय सेवेतील महिला अधिकारी आल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण होते.

# संपादकीय



## युनूस यांची नसती उठाठेव

बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांना पदच्युत केल्यानंतर नोबेल पारितोषिक विजेते मोहंमद युनूस यांची बांगलादेशच्या अंतरिम सरकारच्या मुख्य सल्लागारपदी निवड करण्यात आली. मोहंमद युनूस यांची बांगलादेश सरकारच्या मुख्य सल्लागारपदी निवड झाल्यावर भारताने त्याचे स्वागतच केले. त्यांच्या कारकिर्दीत भारत आणि बांगलादेश यांच्यात मैत्रीचे संबंध प्रस्थापित होतील असे भारताला वाटले होते पण त्यांनी भारताशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचे सोडाच उलट भारताशी पंगा घेण्याचेच त्यांनी ठरवले आहे. मोहंमद युनूस हे पाकिस्तान आणि चीनच्या कच्छपी लागले असून भारताला पाण्यात पाहत आहे. त्यांच्या कारकिर्दीत भारत बांगलादेश संबंध सुधारण्याऐवजी बिघडतच चालले आहे. मोहंमद युनूस हे सत्तेवर आल्यापासून काही ना काही कारणाने भारताची कुरापत काढून भारताशी पंगा घेत आहेत याआधी त्यांनी जमाते इस्लामी या कट्टरपंथीय संघटनेवर घातलेली बंदी उठवली. याच संघटनेने बंदी उठल्यानंतर बांग्लादेशात अल्पसंख्यांक असलेल्या हिंदू धर्मीय नागरिकांवर हल्ले केले. भारताने हे हिंदूंवर होणारे हल्ले रोखवेत अशी विनंती त्यांच्याकडे केली पण त्यांनी त्याकडे सोईस्कर दुर्लक्ष केले त्यामुळे दोन्ही देशातील संबंध बिघडले हे संबंध पूर्ववत करण्या ऐवजी ते हे संबंध कसे बिघडतील हेच पाहत राहिले. भारताला डिवचण्यासाठी त्यांनी पाकिस्तान आणि चीनला जवळ केले. काही दिवसापूर्वी पाकिस्तानच्या गुप्तहेर संघटनेचे म्हणजे आय एस आय चे चार अधिकारी बांगलादेश दौऱ्यावर गेले होते. या अधिकाऱ्यांचे बांग्लादेशात जंगी स्वागत करण्यात आले. या अधिकाऱ्यांनी मोहंमद युनूस यांच्याशी चर्चा केली या चर्चेचा अजेंडा काय होता हे समोर आले नसले तरी यात काय चर्चा झाली असेल हे सांगायला तज्ज्ञांची गरज नाही. या चर्चे नंतर मोहंमद युनूस यांनी पाकिस्तानचे तोंडभरून कौतुक केले. भारताने यावर थेट मतप्रदर्शन केले नसले तरी त्यांनी पाकला जवळ करून भारताला खिजवले हे मात्र नक्की. पाकला जवळ करत भारताशी पंगा घेऊन मोहंमद युनूस शांत बसले नाही आता तर त्यांनी थेट भारताच्या सार्वभौमत्वालाच आव्हान दिले आहे. मोहंमद युनूस हे चार दिवसीय चीनच्या दौऱ्यावर गेले होते. या दौऱ्यात त्यांनी चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्यासोबत ९ करार केले. जे करताना त्यांनी चीनला खुश करण्याचा नादात थेट भारताच्या सार्वभौमत्वालाच आव्हान दिले.

या दौऱ्यात त्यांनी म्हंटले आहे की भारताच्या पूर्वोत्तर राज्यांना समुद्र लागून नाही. ही राज्ये पूर्णपणे जमिनीनी वेढलेली असल्याने चीनने या संधीचा फायदा घेऊन आपला प्रभाव वाढवावा. हे वक्तव्य करून त्यांनी एकप्रकारे चीनला भारताच्या ईशान्येकडील राज्यावर आक्रमण करावे असे चिथावले आहे. इतके करून ते थांबले नाही तर ते पुढे म्हणतात भारताच्या ईशान्येकडील राज्यांना केवळ जमीन आहे त्यांना समुद्र नाही. समुद्र फक्त बांगलादेशला आहे. समुद्राचे स्वामित्व फक्त बांगलादेश कडेच आहे आणि बांगलादेश हाच समुद्राचा रक्षक आहे.

मोहंमद युनूस यांचे हे वक्तव्य अतिशय आक्षेपार्ह आणि निषेधार्ह आहे. त्यांचे हे वक्तव्य म्हणजे भारताला घेराव घालण्यासाठी चीनला आव्हान करणारे आहे. मोहंमद युनूस यांचे हे चिथावणीखोर वक्तव्य भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणारेच आहे. ईशान्य भारताच्या सुरक्षिततेसाठी बांगलादेश सरकारचा हा दृष्टिकोन अत्यंत धोकादायक आहे. भारत सरकारने मोहंमद युनूस यांच्या या वक्तव्याची कडक शब्दात निंदा करायला हवी. ज्या बांगलादेशसारखा देश ज्याच्या स्वातंत्र्याला भारताने मदत केली तोच देश आता भारताच्या विरोधात जात आहे इतकेच नाही तर थेट भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देत आहे हे दुर्दैवी आहे याला आळा बसायला हवा त्यासाठी बांगलादेशला त्यांची जागा दाखवून द्यायला हवी. बांगलादेशने त्यांची ही नसती उठाठेव बंद केली नाही तर भारत त्यांना त्यांची जागा दाखवून देईल असा इशाराच भारताने बांगलादेशला द्यायला हवा.

# अनाथांचा वाढदिवस...

काल मला कळलं की,'शासन कर्ते आपले पालक असतात'.

आणि हो हे अगदी खरं आहे. कारण जिथे संकट आलं तिथं मदत करणारी शासन व्यवस्था असते.या अगोदर आपल्यावर आलेले संकट दूर करण्यासाठी शासन भूकंप,महापूर,अतिवृष्टी, दुष्काळ ह्या नैसर्गिक आपत्तीं मध्ये शासन जनतेच्या मदतीला धावून येते. पिक विमा यासारख्या योजना राबवून शासन आपल्याला मदत करते ही बाब खरी आहे. आणि शासनाने भिक्षा मागणारे भिक्षुकरी,कुमारी माता, विधवा,वृद्ध यांचे पालकत्व स्वीकारलेले आहे.तसेच अनाथ लेकरांचे सुद्धा शासनाने पालकत्व स्वीकारलेले आहे...

शासकीय मुलांचे बालगृह लातूर येथील बालगृहामध्ये प्रवेश घेताना सिंगल पेरेंट्स , चुकलेली मुले,आनाथ मुले यांना प्रवेश दिला जातो.त्यांना त्यांच्या ना आईचे ना बाबाचे प्रेम मिळालेले असते.मायेची सावली,मायेची ऊब व आईचे प्रेम हे सगळे शब्द फक्त त्यांच्या ऐकिवात असतात पण हे सगळं मिळवून देणारं हक्काचं घर म्हणजे शासकीय मुलांचे बालगृह लातूर हे होय असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

यामध्ये राहणे,शिक्षण,जेवण याशिवाय वसतिगृहामध्ये शिकवणी सारखे शिक्षण देणारे सर( अर्थात ट्युशन)यामध्ये खेळाचे,संगीताचे,शारीरिक शिक्षण व चित्रकला शिकवणारे आणि काळजी घेणारे काळजी वाहकही असतात.

काल शासकीय बालगृहामध्ये माझी पत्नी सुवर्णमाला पलमटे ही अधिपरिचारिका पदावर नोकरी करते तिला आणायला जाण्याचा योग आला होता.पण मला कार्यालयात बोलावले आणि महादेव सगट या मुलाचा वाढदिवस साजरा करावयाचा आहे असा मला निरोप मिळाला.ठीक आहे म्हणून मी आत प्रवेश केला.मुलाला टेबल खुर्ची मांडून बसवले होते. डोक्यावर विदुषकाची टोपी घातली होती.स्वयंपाकीन अंबिका ताई यांनी ओवाळणीचे ताट आणलं.अगदी आनंदाने त्या मुलाची ओवाळणी केली आणि काय आश्चर्य नरसिंग नावाचा मुलगा उठला.पेटी हातात घेतली आणि 'हॅपी बर्थडे टू यू' ही धून पेटीवर वाजवली. अहो आपुलकी तर यालाच म्हणतात आणि आपलेपणा खरंच जोपासावयाचा असतो का?तो माणसाकडून जोपासला जातो का?त्या अनाथ मुलाची आई व वडील कोठे असतील?त्यांना आपल्या मुलाचा वाढदिवस लक्षात असेल का? ते इतके निर्दयी का झाले असतील ?त्यांची काय मजबुरी असेल ? आईला मुलाला भेटावं वाटत नसेल का?असे असंख्य प्रश्न नवे वादळच मनात घोंगावले आणि त्यातून नंतर तुम जियो हजारो साल ही धून ऐकली आणि मी स्तब्ध झालो.

नंतर केक म्हणून एक मोठं टरबूज आणलं ते कापून खाऊ घालण्याचा मान मला दिला. माझ्या हाताने खाऊ घालताना माझा हातही आणि मन ही हतबल झाले काय करावे?सुचत नव्हते.आशीर्वाद देण्यासाठी मनात शब्द येत नव्हते पण डोळ्यात अश्रू मात्र तळरत होते.

लेकराच्या जीवनात आनंद देता यावा म्हणून वेगवेगळे प्रयत्न करणारी ही संस्था मुलांना पडणाऱ्या प्रश्नांना संपवण्याचा प्रयत्न करणारी आणि खऱ्या अर्थाने निराधारांना आधार देणारी आहे.त्यांचे जीवन उभे करण्याचा प्रयत्न यातून दिसून येतो.नियम व यंत्रणा आपल्या पेशाचे कर्तव्य सर्वच असते पण ते स्वीकारून कृतीतून दाखवून देणारे फारच कमी असतात. त्यापैकी एक म्हणजे शासकीय मुलांचे बालगृह लातूर हे होय.

अनाथ मुलाचा वाढदिवस आपल्या घरातल्या मुलाच्या वाढदिवसा पेक्षाही उत्साहाने व आनंदाने साजरा होत असतानाचा क्षण या डोळ्यांना पाहता आला,अनुभवता आला आणि मनाला वाटलं सर्व वाढदिवस या बालगृहातील अनाथ मुलांच्या वाढदिवसाच्या पुढे फिकेआहेत.खुर्ची,टेबल,फॅन सर्व अनाथ मुले,सर्व स्टाफ आणि दिमतीला शासकीय यंत्रणा आहेच की.खरंच आपलं पालकत्व शासन स्वीकारतं हे मनोमन पटलं ...

या बालगृहाचे अधीक्षक जवळगे सर,समुपदेशक म्हणून काम पाहणारे पवार सर आणि शासकीय कार्यभार सांभाळणारा शरद आणि काळजीवाहक म्हणून काम करणारे उपाध्ये मामा,बिराजदार मामा,सफाईगार म्हणून काम करणारे आरदवाड मामा, कंत्राटी म्हणून काम करणारे काळजीवाहक गायकवाड भैया,प्रज्वल भैया,सिक्युरिटीचे काम करणारे मामा,भगत भैया आणि सर्वांच्या आरोग्याची काळजी घेणारी सुवर्णा पलमटे,सर्वांच्या पोटाची काळजी घेणारी सौ अंबिका व निशा ताई या सर्वाना मनापासून सलाम .. सलाम. आणि सलामचं भाऊ

**एकनाथ बाबुराव पलमटे**
**(जिल्हाध्यक्ष )**
**लसाक्रम लातूर**
**८३७९०८३१००**

## नऊ वर्षांच्या मुलावर लैंगिक अत्याचार करून निर्घूण हत्या..

**मुंबई :** लहान मुलाला खाऊ व पैशांचे आमिष दाखवून अपहरण केल्यानंतर त्याच्यावर लैंगिक अत्याचार करून त्याची हत्या केल्याचा गंभीर प्रकार चुनाभट्टी परिसरात घडला असून चुनाभट्टी पोलिसांनी १९ वर्षीय तरूणाला अटक केली. आरोपी मूळचा बिहारमधील चंपारण्य येथील रहिवासी आहे. आरोपीने मुलाचा गळा दाबून ठार मारले. मुलाच्या संपूर्ण अंगावर जखमा असल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. मृत मुलगा ९ वर्षांचा असून तो मध्य मुंबईत कुटुंबियांसोबत राहत होता. या मुलाला १९ वर्षीय आरोपी मंगळवारी भेटला. आरोपीने खाऊ व पैसे देण्याचे आमिष दाखवून मुलाला आपल्यासोबत आणले. आरोपी मुलाला बुधवारी पहाटे चुनाभट्टी पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील कुर्ला पूर्व येथील कब्रिस्तान मशिदीशेजारील नागोबा चौक परिसरातील रेल्वे गेटजवळ घेऊन गेला. आरोपी तेथे मुलावर जबरदस्ती करू लागला. आरोपीने अत्याचार करण्यास सुरूवात करताच मुलाने त्याला प्रतिकार केला. त्यावेळी आरोपीने त्याचा गळा दाबला आणि त्याला ठार मारले. याप्रकरणी चुनाभट्टी पोलीस ठाण्यातील उपनिरीक्षकांनी स्वतः तक्रार केली.

### शालु...

कडवट बोलणारी
लागती गोड बोलू
भर भक्कम मनोरे
हळूहळू लागे डोलू

दडवू ठेवली गुपीते
दालनेलागती खोलू
स्वप्न रंजन चालले
हिंदोळेलागले झुलू

काट्यांचे जाऊ द्या
फुलेहीलागती सलू
सत्य उघडू पाहतेय
आवरणे हळू सोलू

दिखावा आहे सारा
नका रे उगाचं भुलू
दगाफटका करणारं
भरवशाचा ना भालू

निंदकांच्या मुखातून
स्तुती सुमनेही झेलू
नुकताचं लावलेला
गगनावरी गेला वेलू

साळसूद बुरख्याची
माणसे भलती चालू
संभ्रमित करी चिजा
एकापारड्यात तोलू

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# ज्ञान गरिबीतून जन्माला येतं....!

ज्ञानाची थोडक्यात परिभाषा म्हणजे अनुभव किंवा शिक्षणाच्या माध्यमातून माहिती व कौशल्य अवगत करून घेणे होय.ज्ञान अवगत करून घेण्यासाठी किंवा एखाद्या गोष्टीविषयी माहिती संकलित करून घेण्यासाठी अनेक कसोटीतून उतरावे लागतं, कारण ज्ञान हे सहजासहजी मिळत नाही. त्यासाठी झटावं लागतं.अपार मेहनत करावी लागते. संघर्ष करावा लागतो.यासंबंधीचे उदाहरणे आपणाला सर्वश्रुत आहे. आणि त्याचबरोबर ज्याला ज्ञान मिळवायचं किंवा ज्ञानी व्हायचं त्याला सुद्धा ज्ञानाची तेवढीच तीव्र भूक लागायला हवी. ओढ, तळमळ असायला हवी. अन ही भूक कशी जन्माला येते तर ती म्हणजे आपल्याला जर जीवनात काहीच उपलब्ध नसेल तर त्यावर आपण आपल्या बुद्धी कौशल्य, तळमळ ओढ ती मिळवण्याचा किंवा प्रयत्न करू जसं की,एखाद्या विदयार्थ्याला पुस्तके शिकण्या साठी पुस्तके नाही, घरची परिस्थिती खूप हलाखीचीआहे की येणाऱ्या उत्पन्नातून घरील गरजाही भागवणे कठीण होत असेल तर त्यांच्या घरचे पुस्तकावर कसा खर्च करेल?कारण पोटाचीआग विझवणेही तेवढेच गरजेचं असते. तेही एकाचं नाही तर कुटुंबातील सर्व सदस्यांचा प्रश्नअसतो अश्या वेळेस कुटुंब प्रमुख एवढ्या गरजा कश्या भागवेल?आपण बघतो एखादा गरीब मुलगा हा खूप हुशार असतो पण त्याला आवश्यक सुख शैक्षणिक सुविधा उपलब्ध नसल्यामुळे अनेक गोष्टीपासून तो वंचित असतो, त्याला त्या भेटत नाही परंतु, त्याला त्याची ज्ञानाची भूक भागवायची असते. त्यासाठी तो अतोनात प्रयत्न करतो. ज्याला खरोखर ज्ञानाची भूक तळमळ,ओढ व तीव्र इच्छा निर्माण झाली असेल तर कुठेतरी काहीतरी छोटं मोठं काम शोधेल.शाळा कॉलेज सांभाळून एखाद्या दुकान, मेडिकल वर मदतनीस म्हणून काम करेल, वृत्तपत्र वाटप करेल,किंवा ऑफिस बॉय अथवा जी आवड असेल जसे की, पेंटिंग, रंगकाम वगैरे तर सुटीच्या दिवशी त्या कामावर जाईल व आलेल्या मिळकती तून थोडी -थोडी पैशांची बचत करून पुस्तक खरेदी करेल म्हणजे करेलच.....! आणि पुस्तक वाचनातून त्याची ज्ञानाची भूक भागवेल,कारण त्याला त्याची तीव्र ओढ, व ज्ञानाची भूक लागलेली असते अन ती शमवण्यासाठी त्याने जीवनात संघर्ष केलेला असतो. मेहनत केलेली असते. हे कसं शक्य झालं तर गरिबीमुळे....! कारण ओढ,तीव्र इच्छा,भूक हि श्रीमंत असणाऱ्यांना कशी कळेल? तो बापाकडून पैशे घेईल आणि लगेच पुस्तकालयात जाईल आणि पुस्तक खरेदी करेल. पण त्याला त्याची जाणीव राहणार नाही मात्र, गरीब मुलाला पुस्तक विकत घेण्यासाठी काय संघर्ष करावा लागला. तो ते पुस्तक वाचतांना, पुस्तकातील एक-एक ओळी आणि अक्षर वाचतांना स्मरणात ठेवेल. त्याला त्याची जाणीव होईल. आणि तीच एक -एक ओळी अन एक -एक पान त्याचं जीवन घडवत राहील.

ज्ञान कधीच श्रीमंतीतून जन्माला येत नाही तर, ते गरिबीतूनच जन्माला येतं.कारण श्रीमंताच्या गरजा पैशाने पूर्ण झालेल्या असतात परंतु, गरीबांना त्याच्या ज्ञान, मेहनत व तळमळीच्या माध्यमातून जीवन जगण्यासाठी आर्थिक गरजा भागवायच्या असतात. हेच उदाहरण नोकरीं बरोबर उद्योग व्यवसायासाठीही लागू पडते. कारण शिक्षण घेऊनही नोकरी नाही, मिळाली तर त्यांना दैनंदिन गरजा भागवायचा असतात. मग तो कुठल्याही स्वरूपाचा व्यवसाय असोत,त्यासाठी सुद्धा व्यवसायातील कौशल्य ज्ञान आवश्यक असते. ज्ञान आत्मसात करण्यासाठी सर्वप्रथम त्याला ज्या क्षेत्रातील व्यवसाय करायचा आहे. त्यासाठी त्याला प्रशिक्षण घ्यावे लागेल. वस्तूंची जुळवा जुळव करण्यासाठी पैश्याची आवश्यकता भासेल. अश्या सर्व अडचणी ना सामोर जाऊन जो व्यवसाय करायचा आहे. त्याचे ज्ञान व कौशल्य मिळवायचे असते. ते त्याला जिद्दीने,मेहनतीने मन लावून मिळवावं लागेल,कारण ज्ञानातून त्याला पुढील विकास साधायचा असतो. त्यातूनच तो व्यवसाय नोकरी उत्कृष्टरित्या पार पाडू शकेल,कारण ज्ञानाच्या माध्यमातून कुठलाही व्यवसाय शक्य आहे. अगदी सर्वसामान्य उदाहरण म्हणजे हात-गाडीवरील एकदा छोटा व्यवसाय जसे की,नास्ता सेंटर, भाजीपाला दुकान,किराणा दुकान, कटलरी दुकान,अथवा गरजू गरीब महिलांचे शिवण केंद्र किंवा सौंदर्य प्रसाधन चे दुकान असो ह्या सर्व व्यवसायासाठी त्या संबंधीचे ज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे. मात्र हे सर्व घडतं ते केवळ गरिबी, व दैनंदिन गरजेतून..! अन हा संघर्ष गरिबांसाठीच असतो.

ज्ञानाचे संकल्पना ही स्वतः कष्ट करणारे असो वा विद्यार्थी मित्रांच्या पालकांसाठी असो सर्वांना सारखीच पूरक असते कारण, एका वर्गात जवळपास तीस ते चाळीस मुले असतात.त्याच वर्गात डॉक्टर,इंजिनिअर, च्च अधिकारी,उद्योजक त्याच बरोबर शेतकरी, हातमजूर यांची मुलं सुद्धा शिकायला असतात. श्रीमंत मुलांच्या ज्ञानाची भूक फारशी नसते कारण त्यांच्या गरजा वेगळ्या असतात. कुणी राजकारणी असेल तर तो वडिलांचे जागेवर वडिलोपार्जित राजकारणी होण्याची शक्यता असते. व्यवसायिक,अधिकारी यांच्या मुले सुद्धा त्याच पद्धतीने जीवन जगतात.त्यांना वडिलांच्या पैशांच्या कमाईवर ,मौज मजा मस्तीत आनंद वाटतो.परंतु शेतकरी, हातमजूर यांचे मुलांनी आपल्या आई - वडिलांचे हालाखीचं जीवन अगदी जवळून बघितलेलं असतं. त्यांना या सर्व गोष्टींची जाणीव असते. त्यामुळे ते एशआराम न करता आपली शिक्षणाची, ज्ञानाची भूक खूप मेहनत,संघर्ष करून भागवततात,कारण शिक्षण, ज्ञान आत्मसात करून त्यांना आई-वडिलांना सुखात ठेवायचे असते. म्हणून तुमचे शिक्षणावर ज्ञानावर भर देतात. ज्ञान आत्मसात करतात. मार्क्स मिळवतात व त्यानंतर उच्च पदाची नोकरीसाठी धडपड करतात. ज्ञानी होऊन उच्च पदावरील नोकऱ्या मिळवतात. मग आपण दैनिक वृत्तपत्रांमध्ये बातम्या वाचतो की, धुणी-भांडी करणाऱ्या बाईचा मुलगा तहसीलदार झाला, रिक्षा चालकाचा मुलगा अधिकारी झाला, शेतकऱ्याचा मुलगा जिल्हाधिकारी झाला, हातमजुराचा मुलगा अनुकमुक अधिकारी झाला,परंतु एखाद्या व्यवसायिकाचा, राजकारण्याचा मुलगा जिल्हाधिकारी झाला असे आपण कधीच बघत नाही, कारण त्यांनी गरिबीचे चटके कधी सहन केलेलेच नसतात, मात्र गोरगरिबांच्या मुलांनी संघर्ष अगदी जवळून बघितला असतो. म्हणून ते सुद्धा ज्ञान आत्मसात करण्यासाठी जीवनात संघर्ष करतात. म्हणूनच ज्ञानाला जन्माला येण्यासाठी गरिबीचे चटके सहन करावे लागतात. म्हणूनच म्हटल्या जातं ज्ञान गरिबीतूनच जन्माला येतं.

**श्री.विनोद शेणफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

## अवैध वाळू वाहतूकीवर महसूल व पोलिस प्रशासनाची कारवाई - सचिन लंगुटे

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०३, पंढरपूर :** अवैध वाळू उपसा व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. महसूल व पोलीस प्रशासनाच्या पथकाने माण व भीमा नदीपात्रात अवैध वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणारे तीन अशोक लेलँडचे पिकअप व ट्रॅक्टर अशी एकूण चार वाहने जप्त करण्यात आल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार सचिन लंगुटे यांनी विविध पथकांची नेमणूक केली आहे.

दिनांक ०३ एप्रिल २०२५ रोजी पहाटे ३.०० वाजता महसूल व पोलीस पथकाने माण नदी पात्रामध्ये अवैध वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या अशोक लेलँड कंपनीचे वाहन क्रमांक एमएच ०९ एफएल ५१२२, एमएच ०९ एफएल -६३८४ व बिगर नंबर वाहन तसेच मौजे गोपाळपूर येथील भीमा नदी पात्रात स्वराज्य कंपनीचा ट्रॅक्टर पकडून जप्त करण्यात आला आहे. ही सदर वाहने शासकीय धान्य गोदाम पंढरपूर येथे लावण्यात आली आहेत.

या कारवाईमध्ये मंडळ अधिकारी पंकज राठोड, ग्राम महसूल अधिकारी साईनाथ अडगटाळे, नवनाथ मोरे, सरताज मुजावर, पोलीस पाटील दत्तात्रय जाधव, महसूल सेवक साहेबराव भोपळे व तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस हेडकॉन्स्टेबल सुधीर शिंदे पोलीस कॉन्स्टेबल राम खेडकर व होमगार्ड महेश कुंभार सहभागी होते.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# बनाईदेवी यात्रेनिमित्त भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३,पारनेर (अहिल्यानगर) :** शेतकरी वर्गासाठी मुख्य आकर्षण असलेल्या पारनेर तालुक्यातील टाकळीढोकेश्वर येथिल बनाईदेवी यात्रेनिमित्त गुरुवार, दिनांक ०३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ८ वाजता भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते.

यात्रेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या बैलगाडा शर्यतीचे उद्घाटन यात्रा कमिटीचे अध्यक्ष माजी सरपंच शिवाजी खिलारी यांच्या हस्ते करण्यात आले. या बैलगाडा शर्यतीचा ग्रामस्थांनी लाभ घेण्याचे आवाहन शिवाजी खिलारी यांनी केले.

उद्घाटनप्रसंगी उपस्थितांचे आभार बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष बाळकृष्ण पायमोडे यांनी मानले. यावेळी पारनेर तालुका खरेदी विक्री संघाचे चेअरमन ॲड.बाबासाहेब खिलारी, माजी सभापती अरुण ठाणगे, खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी, ग्राम.पं.सदस्य बापूसाहेब रांधवण, युवा उद्योजक संजय झावरे, धोंडीभाऊ झावरे, गणेश चव्हाण, उत्तम तळेकर, सचिन उगले, विवेक धुमाळ, वैभव पायमोडे, सचिन सैद, तुकाराम झावरे, विष्णू धुमाळ यांच्यासह बैलगाडा मालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी स्वामी समर्थ नगर येथील घाटावर जिल्ह्याच्या विविध भागांतून आलेले बैलगाडा मालक आणि शौकिनांची मोठी गर्दी झाली होती.

भिर्ररर..भिर्र.. झाली.. आहा रे सर्जा..वाह रे पठ्ठ्या.. शाब्बास रे फकड्ड्या..' यामध्ये गावकीच्या बैलगाड्यासह एकूण २०० बैलगाडे स्पर्धकांनी सहभाग घेतला. एक दिवस रंगलेल्या या बैलगाडा शर्यतीचा आनंद हजारो बैलगाडाप्रेमींनी घेतला. बनाईदेवी यात्रोउत्सव कमिटी व समस्त ग्रामस्थ टाकळी ढोकेश्वर यांनी या शर्यतीचे आयोजन केले होते. या बैलगाडा शर्यतीसाठी प्रथम क्रमांकाचे बक्षीस महावीर उद्योग समूहाचे सर्वेसर्वा राजेश भंडारी, सुनील फापाळे, डॉ. प्रदीप दाते यांनी ७५००/- हजार रुपये, द्वितीय क्रमांकास समस्त ग्रामस्थ टाकळी ढोकेश्वर यांनी ७५००/ - हजार रुपये तर तृतीय क्रमांकासाठी सरपंच सचिन सैद, अभिनव पाटोळे, वासुंदे, राजूशेठ गागरे मांडवा, राहुल गुंड काटाळवेढा, संभाजी सुरसे भाळवणी, प्रकाश गाजरे, सरपंच म्हसोबाझाप, सचिन गोडसे, सावरगाव, गणेश रोकडे, वडगाव सावताळ यांच्या वतीने ५१००/- हजार रुपयांचे बक्षीस देण्यात आले आहे.



**खासदार निलेश लंके, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, महावीर उद्योग समूहाचे प्रमुख राजेश भंडारी यांनी या नवीन बैलगाडा घाटासाठी विशेष निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे बनाईदेवी यात्रा कमेटीने व टाकळीढोकेश्वर ग्रामस्थांनी तसेच पारनेर तालुका बैलगाडा चालक मालक संघटनेने आभार मानले आहे.**

# 'जात वैधता' नसल्याने बिलोली तालुक्यातील ६८ जणांचे ग्रा.पं.सदस्यत्व रद्द

## जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची धडक कारवाई

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०३, बिलोली (नांदेड) :** निवडून आल्यानंतरही एक वर्षाच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी विविध ग्रामपंचायतींच्या १ हजार ३६५ जणांचे सदस्यत्व रद्द केले आहे. यात बिलोली तालुक्यातील ६८ ग्रामपंचायत सदस्यत्व जात वैधता प्रमाणपत्र नसल्याकारणाने रद्द करण्यात आले आहे.

या धडक कारवाईमुळे खळबळ उडाली आहे. कायद्यातील लवचिक तरतूद आणि पुन्हा-पुन्हा मिळणारी मुदतवाढ यामुळे निवडून येऊन ४ वर्षांनंतर ही राखीव जागेवर निवडून आलेल्या पैकी बहुतांश जणांनी जात पडताळणीचे वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही. वास्तविक निवडून आल्यानंतर एक वर्षाच्या आत ते प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गाचा सत्तेत सहभाग असावा, जेणेकरून आपल्या समाजबांधवांच्या समस्या प्राधान्याने सोडवून त्यांना मुख्य प्रवाहात आणता यावे. यासाठी ही राजकीय आरक्षणाची तरतूद आहे.



या आरक्षणाचा लाभखऱ्या हक्कदाराला मिळावा, यासाठी निवडणूक उमेदवारी अर्ज भरतानाच जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र दाखल करण्याची अट होती. परंतु, ती शिथिल करण्यात आली. निवडणुकीत विजयी झाल्यानंतर वर्ष पूर्ण होण्याच्या अगोदर जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आले.

दरम्यान आरक्षित जागेवर निवडणुक लढवून विजयी झाल्यानंतरसुद्धा विविध मुदतीत जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र सादर केले जात नाही. याबाबत आक्षेप घेतल्यानंतर प्रशासनाला चौकशी सत्र सुरू करावे लागते. वारंवार सुनावण्या घ्यावा लागतात. अशाप्रकारे ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया होऊन बसली आहे. शासनसुद्धा कोणत्या ना कोणत्या कारणामुळे हे प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ देते.

वास्तविक अशा प्रकरणात फास्ट ट्रॅक सुनावण्या होऊन कारवाई होणे अभिप्रेत आहेत. तसेच दोषी व्यक्तींविरुद्ध कडक कारवाईसुद्धा गरजेची आहे. पण प्रत्यक्षात सुनावण्या होऊन निकाल लागेपर्यंत सदर निवडून आलेल्या सदस्याचा अर्ध्यापेक्षा अधिक काळ झालेला असतो. शिवाय तो दोषी आढळल्यास फक्त सदस्यत्व रद्द होणे, एवढी किरकोळ कारवाई केली जाते. दोषी व्यक्ती पुढच्या निवडणुकीत सुद्धा निवडणूक लढण्यास पात्र ठरतो त्यावेळेसही त्यांच्याकडे जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र नसते तरी तो शपथपत्र देऊन निवडणूक लढवायला मोकळा होतो. यामुळे प्रशासनाची मोठी यंत्रणा व वेळ वाया जातो.

नांदेड जिल्ह्यात राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या ग्रामपंचायत सरपंच तसेच सदस्यांना अपात्र करण्याबाबत तीन वर्षापूर्वी प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. ०१ जानेवारी २०२१ ते १० जुलै २०२३ यादरम्यान पार पडलेल्या ग्रामपंचायत सार्वत्रिक व पोटनिवडणुकीत राखीव जागेवर निवडून आलेल्या संबंधित सरपंच व सदस्यांना विहित मुदतीत जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे अपात्र करण्यासाठी यापूर्वी दोन सुनावण्या झाल्या होत्या. जिल्ह्यातील सुमारे १ हजार १३ ग्राम पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी १५ जानेवारी २०२१ रोजी मतदान होऊन १८ रोजी निकाल लागला. तसेच पुढे १० जुलै २०२३ पर्यंत अन्य काही ग्राम पंचायतीच्या निवडणुका पार पडल्या. या सर्व निवडणुका राखीव जागेवर निवडून आलेल्या सदस्यांनी विहित वेळेत जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे अभिप्रेत होते.

परंतु, अनेकांनी तसे केले नाही परंतु आक्षेपानंतर काही प्रकरणी सुनावण्या होऊन संबंधितांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले. शिल्लक राहिलेल्या आक्षेपांपैकी जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या सदस्यांची संख्या बिलोली तालुक्यात ६८ जणांनी जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र वेळेत सादर केले नाही. परिणामी त्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे. सदरील कारवाईमुळे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचे सर्वत्र जनतेतून कौतुक होत आहे. यापुढे ही असेच धाडसी निर्णय व कारवाई ते नक्कीच करतील अशी जनतेतून अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# शेतकऱ्यांच्या शेतात धरणाचे पाणी; जनावरांचा चारा पाण्याचा प्रश्न मार्गी

## आमदार सुहास कांदे यांच्या प्रयत्नाला यश

**अक्षराज : निवृत्ती शिंदे**

**दि.०३, नांदगाव (नाशिक) :** नांदगाव तालुक्यातील पिंप्राळे शिवारात ऐन उन्हाळ्यात पाणी प्रश्न भेडसावत होता. शेती पिके होरपळत होती. जनावरांच्या चारा प्रश्न निर्माण झालेला होता. अशा परिस्थितीत पिंप्राळे येथील शेतकऱ्यांनी आमदार सुहास अण्णा कांदे व सहकाऱ्यांची भेट घेत आपले प्रश्न मांडले.

आमदार सुहास कांदे परिस्थितीची दखल घेत तात्काळ प्रकल्प प्रशासनाला सूचना करत सहकार्यांद्वारे शेतकऱ्याचा प्रश्न मार्गी लावणे बाबत कळविले असता, प्रकल्प प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी दखल घेत गुरुवार, दिनांक ०३ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ४ वाजता नाक्या-साक्या धरणातील डावा कालवा पाटचारीद्वारे पिंप्राळे शिवारातील शेतकरी, प्रकल्प कर्मचारी, मनमाड बाजार समितीचे माजी सभापती अंकुश कातकडे यांच्या हस्ते गेट उघडत सर्वांचे उपस्थितीत पाटचारी द्वारे पाणी सोडले. याकामी युवा सेना अध्यक्ष सागर हिरे यांचे विशेष प्रयत्न असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. यावेळी शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते.



यावेळी काळू शिंदे व सहकार्यांद्वारे उपस्थित मान्यवर प्रकल्प कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. पिंप्राळे शिवारात मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई जाणवत होती. आता जनावरांच्या चारा पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल. असे शेतकरी बांधव यावेळी व्यक्त होत होते. यावेळी शेतकरी बांधवांच्या वतीने आमदार सुहास अण्णा कांदे यांचे विशेषआभार व्यक्त करण्यात आले.

# महसूल मंत्री यांच्या हस्ते आजदूरदृश्य प्रणालीद्वारे राज्यातील ३० भूप्रमाण केंद्रांचे उद्घाटन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, ठाणे :** तहसिल कार्यालयामध्ये सुरू असलेल्या सेतु सेवा कार्यालयाच्या धर्तीवर भूमी अभिलेख विभागातील उप अधीक्षक भूमी अभिलेख, ठाणे आणि उप अधीक्षक भूमी अभिलेख, शहापूर या कार्यालयातील भुप्रमाण केंद्राचे उद्घाटन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते शुक्रवार, दि.०४ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९ वाजता दुरदृश्यप्रणालीद्वारे संपन्न होणार आहे.या केंद्रामध्ये संगणकीकृत मिळकत पत्रिकेवरील फेरफार सर्व प्रकारचे ऑनलाईन फेरफार अर्ज, ई मोजणी व्हर्जन २.० मधील सर्व प्रकारचे मोजणी नकाशे, मिळकतीच्या डिजिटल सही केलेले फेरफार, नोंदवही उतारे आणि ऑनलाईन अर्ज करायची सुविधा, तसेच नकाशे व स्कॅन अभिलेख याच्या डिजिटल सही केलेल्या नकला, जनतेला वाजवी दरामध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.यापूर्वी भूमी अभिलेख विभागातील विविध प्रकारचे नकला मिळविण्यासाठी नक्कल अर्ज करण्यासाठी जनतेला कार्यालयात छापील अर्ज करून हेलपाटे घालावे लागत होते. तसेच ऑनलाईन अर्ज करण्यासाठी नागरिकांची खाजगी संस्थेकडून आर्थिक पिळवणूक होत होती आणि सुविधा वेळेत मिळत नव्हत्या. परंतू आता भूप्रमाण केंद्राच्या माध्यमातून जनतेला सर्व सुविधा वेळेत आणि वाजवी दरात मिळाल्यामुळे प्रशासनातील विलंब कमी होऊन लोकाभिमुख प्रशासनाला हातभार लागणार आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये एकुण ३० भूप्रमाण केंद्राचे उद्घाटन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते होत असून यामुळे भूमी अभिलेख खाते लोकाभिमुख होणार आहे.

# थोडक्यात

## सावित्रीबाई फुले शाळेतील १७ विद्यार्थी केंद्राच्या गुणवत्ता यादीतयशाची परंपरा कायम

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०३, चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिकेच्या पीएम श्री सावित्रिबाई फुले शाळेतील राष्ट्रीय दुर्बल घटक शिष्यवृत्ती (एनएमएमएस) परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या २० विद्यार्थ्यांपैकी १७ विद्यार्थी हे केंद्राच्या गुणवत्ता यादीत झळकले आहेत. शहरातील एका शाळेतील सर्वात अधिक संख्येने या परीक्षेत उत्तीर्ण होण्याचा मान मनपा शाळेने मिळविला आहे. जातीनिहाय आरक्षण असणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक कल्याणकारी शिष्यवृत्ती योजनांचा दरवर्षी लाभ मिळत असतो. परंतू ग्रामीण भागातील आर्थिक दुर्बल घटकातील प्रतिभावंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी देशपातळीवर एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षा मिनिस्ट्री ऑफ ह्युमन रिसोर्सेस भारत सरकार नवी दिल्ली यांचे मार्फत घेण्यात येते. आर्थिक मागास विद्यार्थ्यामधून प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांच्या प्रक्षेची जोपासना, तसेच त्यांचे १२ पर्यंत शिक्षण पूर्ण व्हावे, हा या योजनेचा गाभा आहे. प्रज्ञावान विद्यार्थ्यांना दरमहा शिष्यवृत्तीच्या स्वरुपात आर्थिक मदत करण्यात येते. सदर शिष्यवृत्ती सलग ४ वर्षे म्हणजे ८ ते १२ वी पर्यंत मुलांना देण्यात येते. यापूर्वी शिष्यवृत्तीसाठी पात्र असणाऱ्या प्रतिभावंत विद्यार्थ्यांना प्रती वर्षासाठी १२ हजार याप्रमाणे ४ वर्षासाठी ४८ रुपये मिळत होते. आता यात एक वर्ष वाढल्याने त्यात १२ हजार रुपयाची वाढ झाली आहे. तसेच याआधी पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा दीड लाख रुपये होती. आता त्यात २ लाखांनी वाढ झाल्याने साडेतीन लाख रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या मुलांना देखील ही शिष्यवृत्ती परीक्षा देता येत आहे.

मनपा शाळेतील गुणवत्तेमध्ये प्रज्वल वैरागडे, भूमिका निखाडे, केसीकौर भोयर, सोहम सोरते, संस्कृती घोटेकर, श्रेयस दुर्योधन, आरोषी देवघरे, शौर्य आंबटकर, रिंपा मजुमदार, माही निमगडे, वैष्णवी कंदीकुरवार, गणेश ठाकरे, वंश पवार, समिक्ष गोदरवार, गौरव नंदनवर, लोकेश जेंगठे, प्रशिल रामटेके या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.आयुक्त विपिन पालीवाल यांच्या नेतृत्वात, अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, उपायुक्त मंगेश खवले, यांच्या प्रेरणेने व मुख्याध्यापक नागेश नित, वर्गशिक्षक जोगेश्वर मोहारे, विषय शिक्षक मंगेश अंबादे, सचिन रामटेके यांच्या प्रयत्नाने शाळेला यश प्राप्त झाले असून सर्वांनी यशस्वी (पात्र) विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## रांजणगाव सेवा सोसायटीचा १०० टक्के वसुल !



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०२, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील रांजणगाव विविध सेवा सहकारी संस्थेचा वसुल १०० टक्के झाला असून सेवा संस्थेच्यावतीने संस्थेचे विद्यामान चेअरमन अनिल जवक, व्हायसचेअरमन ओंकार सोनवने यांनी सभासदांचे अभिनदन केले आहे. विविध कार्यकारी सेवा सोसायटी स्थापने पासून आज कित्येक वर्षे झाली. सोसायटीचा वसुल हा मुदतीच्या आत १०० टक्के झालेला असतो. ही वस्तुस्थिती आहे. पारनेर तालुक्यात रांजणगाव सेवा सोसायटी ही वसुली संदर्भात अग्रेसर आहे, असे दिसून आले. दुसरे विशेष म्हणजे रांजणगाव सेवा सोसायटीची निवडणूक ही स्थापने पासून निवडणूक ही बिनविरोध होत असते. ही परंपरा आजही पाहायला मिळते. स्थापने पासूनची ही परंपरा कै.आण्णासाहेब शिंदे (पाटील) यांच्या एकसंघ विचारांच्या अनुषंगाने चालू होऊन पारनेर तालुक्याचे तरूण नेतृत्व करणारे भाजप तालुका अध्यक्ष राहुल शिंदे (पाटील) यांनी आज ही बिनविरोध निवडणूक प्रक्रिया आजही अस्तित्वात पहायला मिळते.

## ग्रामीण भागात बाल साहित्य संमेलन भरवणे काळाची गरज - आश्रुबा कोठावळे

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०३, कळंब (धाराशिव) :** शहरीकरणा बरोबरच ग्रामीण भागात सुद्धा मोठ्या प्रमाणात बाल साहित्यिक आहेत. यांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी साहित्य संमेलन आयोजित करणे काळाची गरज असल्याचे मत बाल साहित्यिक आश्रुबा कोठावळे यांनी भूम येथिल बालकुमार मराठी साहित्य संमेलनात मार्गदर्शन करताना व्यक्त केले.

गुरुवार दि.३ एप्रिल २०२५ रोजी भूम येथिल जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये अखिल भारतीय बालकुमार मराठी साहित्य संस्था पुणे तालुका शाखा भूम व जनसेवा ग्रामीण विकास संस्था उळूप तालुका भूमच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय बालकुमार मराठी साहित्य संमेलन आदर्श मुख्याध्यापक तात्यासाहेब कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या साहित्य संमेलनाला भूम, वाशी, कळंब तालुक्यातील बालकुमार साहित्यिकासह ज्येष्ठ साहित्यिकांची मोठया प्रमाणात उपस्थिती होती. या साहित्य संमेलनात ऊन, वारा , पाऊस, आई, वडील, निसर्ग, शेती अशा वेगवेगळ्या विषयाला हात घालून बाल साहित्यिकानी आपल्या स्वरचित काव्य सादरीकरण करून उपस्थित सर्वांचं लक्ष वेधून घेतलं, या संमेलनातून काव्य वाचन केलेल्या प्रत्येक बालकवीला आयोजकांच्यावतीने सन्मान चिन्ह, सन्मानपत्र व छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रमाता जिजाऊ साहेब यांच्या चरित्र असलेल्या पुस्तकांची भेट देण्यात आली. याशिवाय प्रथम समता ठाणांबीर, व्दीतीय प्रांजल खैत्रे, तृतीय आकांक्षा थोरात यांना सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व पुस्तक भेट देऊन तर समृद्धी म्हेत्रे, मयुरी जाधव व वैष्णवी शेळके यां बालकवींना उत्तेजनार्थ म्हणून सन्मानीत केले .

बालकुमार मराठी साहित्य संमेलनासाठी मार्गदर्शन म्हणून धर्मदत अरुण अण्णा शाळू महाराज, बाल साहित्यिक आश्रुबा कोठावळे कळंब, ॲड विलास पवार कवित्री संध्याराणी कोल्हे कळंब, जेष्ठ गझलकार शेखर गिरी, आशा राऊत कवयित्री कळंब, गोकुळ गायकवाड जामखेड यांची उपस्थिती होती.